# सेवा उद्योग

या देवी सर्व भूतेषु नारी रुपेण संस्थिता !
न्नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै  नमि नम :!

सर्व उद्योगिनींना, महिला भगिनींना माझा नमस्कार जागतिक महिला दिन ८ मार्च हा दिवस सर्व ठीकाणी वेगेवगेळया संस्था , संघटनांच्या माध्यमातून महिलांसाठी साजरा करतो.

राज्यव्यापी उद्योजक महिला परिषदेच्या वेळी सातत्याने १८ वर्ष महिला उद्योगिनींना पुरस्कार देण्यात येतात. नाशिकच्या विजया पाटील ९४२३१४१४२१ पती अचानक मुंबईत उद्योगाच्या कामासाठी येतो परंतु घरी परत येतच नाही. अशा परिस्थितीत अनुभव नसतानांही पतीचा व्यवसाय वाढवते. मुलांना मोठं करते दु:ख , अपमान. अवहेलना यांच्या कडे दुर्लक्ष करत कामगारांसाठी आपल्या मुलांसाठी इंजिनिअरिंग कंपनीचा अनुभव नसातंना ए ए इंजिनिअरिंगचा पसारा वाढवते. युनियनची सर्व कामे कामगारांचा त्रास अशा परिस्थितीतून लढाई जिकण्याची ठरवून निर्णयक्षमता वाढवते व्यवसायात सेट बॅक बसूणही पुन्हा नव्या जोमाने काम करते टेक्निकल नॉलेज असणाऱ्या व्यक्तीच्या मदतीने आता नाशिकमध्ये ४ कारखाने उभारते
१००-१५० कामगारांना काम देते व स्वत:च्या विजयाची पताका महाराष्ट्रात उंचविते सोलापूरमधील रुपा कडमुसे ७ महिलांना संघटीत करुन अक्कलकोट तालुक्यातील जेऊर गांवी एका शेडमध्ये सॅनिटरी पॅडचे उत्पादन प्रकल्प उभा करतात. रुपाचे पती हिरण्णा व रुपा कडमुसे हे या सॅनिटरी नॅपकीन लघू उद्योग क्षेत्रातील रोल मॉडेल आहेत निर्मल ब्रॅण्ड (९४२०५४५९७१ ) सोलापूर गावातील महिलांचे आरोग्य व स्वच्छता या विषयात क्रांती घडविणाऱ्या समाजसेविका तयार करत आहेत. अशा आधुनिक उत्पादन प्रकल्पाला मंदीराचे रुप प्राप्त झाले आहे.

बुलढाण्याच्या रेखा बोरकर (९४२२४६९६८८) यांनी संपूर्ण महाराष्ट्रात साड़ी बेडशीटवर एमब्रॉयडरी वर्क करुन देणारा उद्योग नावारुपाला आणळा आहे. प्युअर सिल्क कोसा यांच्या ६० -७० रंगाच्या छटा असलेल्या सांडयांचा माल थेट मिलमधूण विकत घेतात. त्या साड्यांवर एम्ब्रॉयड़रीचे काम करुन दिल्याने साडीची  शान वाढते व त्यामुळे ग्राहकही खुश होतो.

एम ए ची डी ग्री घेऊन टाटा सामाजिक संस्थेतून सोशल वर्कचा कोर्स केलेली वर्षा फातरफेकर ९८२३९४३०७२ आदिवासी महिलांबरोबर का करतात २००४ पासून आदिवासी सहज शिक्षण परिवाराच्या बरोबर वारली चित्रकलेचा प्रचार प्रसार करण्याचे

काम गृहसजावटीसाठी , कापडाला सुशोभित करण्यासाठी वापरतात प्रदर्शनाच्या माध्यमातून आदिवासी सहज या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी हे प्रोडक्ट दुबई पर्यंत पोहचवले आहेत. औरंगाबादच्या मैथिली तांबोळकर संजीव ग्रुपच्या माध्यामतून अभ्यासपूर्वक कामगिरी करुन ऑटो मोबाईल इंडस्ट्रीमध्ये आपला नावलौकीक करीत आहे. नागपूरच्या स्नेहा पळसोकर यांनी सुध्दा आयनेक्स ह्या आपल्या कंपनीचे नाव जगभरात पोहोचवले आहे. फस्ट्र जनरेशन उद्योगिनी तसेच व्यवसायाची पार्श्वभूमी नसलेली स्नेहा काचेच बेसिन तसेच स्विमिंग पूल च्या नाविन्य पुर्ण सजावटीने सर्वाच्या घराला एक देखण रुप प्राप्त करुन देत आहे. मुंबईतील शुभांगी तिरोडकर ९९६७६२४४७७ सिमेंट उद्योग क्षेत्रातील पहिली महिला स्टॉकीस्ट असून सिमेंट पुरविण्याच्या व्यवसायात आपला नावलौकीक निर्माण केला तसेच स्वतःच्या जिद्दी व अपार कष्टाच्या जोरावर आज त्या कार्यरत आहेत व आपल्या सोबतच समाजातील इतर महिलांना ही तयार करत आहेत. रत्नागिरीच्या शिल्पा करकरे ९८९२५८४३३२ यांनी तुरळ येथे मुंबईतील तरुण पिढीच्या कल्पनेतील मामाचे गाव वसवले आहे तसेच डेस्टिनेशन वेडींगचेही आयोजन त्या निसर्गरम्य वातावरणात करतात. सीमा रामधरणे ९२२६९३५४३९ यांनी ही पेण येथे माई महिला गृहउदयोगच्या माध्यमातून उत्तम प्रकारे वाळवणाचे पदार्थ तयार करुन स्वतः सोबतच स्थानिक पातळीवर इतरांना रोजगार उपलब्ध करुन दिला आहे. ठाण्यातील मीनल झेंडे ९८२०९८१६९३ ह्या पहिल्या महिला आहेत ज्यांनी ॲड्वर्व्हटायझिंग क्षेत्रात पदापर्ण करुन खूप जणांच्या व्यवसायांना टी व्ही वृत्तपत्र, इव्हेंटस च्या माध्यमातुण ओळख निर्माण करुन दिली आहे. कमीत कमी वेळात आपला व्यवसाय एका जाहीरातीच्या माध्यमातून प्रभावशाली रित्या लोकांपर्यंत पोहचवण्याचे काम त्या करतात. कळवा येथील श्वेता सावंत ९८२०२६१०२० ही ब्रॅण्डींग च्या माध्यमातून उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देते.

एक स्त्री घरातील उद्योगातील सुख दुखाच्या वाटेवर जातांना सर्वांना सांभाळत उद्योगाचा पसारा वाढवते छोटयाशा लावलेल्या रोपटयाचे रुपांतर वटवृक्षात होते. परंतु ती स्वतः कणखरपणे , जिद्द, चिकाटीच्या जोरावर घर व संसार उद्योगाचा पसारा डोलारा संभाळत शांतपणे मार्गक्रमण करत रहाते.

स्त्री अपयशाला कुरवाळत नाही तर मागे टाकून अनुकुल वेळेची सतर्कतेने संधी शोधत पुढे जाण्यातच यशाची खात्री बाळगते यशाची किंमत वा थोरवी अपयशानेच

ठरते. अपयशाने खचून न जाता मार्गक्रमण करत रहाते.  अशाच स्त्रिया महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात आपापल्या परिने कार्यरत आहेत त्यांना ऑल द बेस्ट

**मीनल मोहाडीकर -**
**माजी अध्यक्ष महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज ॲन्ड ॲग्रीकल्चर**
**उपाध्यक्ष महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ**
**अध्यक्ष आम्ही उद्योगिनी प्रतिष्ठान**
ईमेल : **registerme@aamhiudyogini.com**
**०२२-२४३१२४२६**